# सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
## व्यवस्थापन परिषदेच्या एकोणचाळीसाव्या सभेचा कार्यवृत्तांत
## गुरुवार, दि.१२ जानेवारी, २०१२ दुपारी १२:०० वा.

**व्यवस्थापन परिषदेची एकोणचाळीसावी सभा गुरुवार, दि.१२/०१/२०१२ रोजी दुपारी १२:०० वाजता** व्यवस्थापन परिषद कक्षात मा. कुलगुरू महोदय यांचे अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती.

सभेस खालीलप्रमाणे उपस्थिती होती.

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद |
|---|---|---|
| १) | मा. प्रा. डॉ. बंडगर बी. पी. - कुलगुरु | अध्यक्ष |
| २) | डॉ. सुर्यवंशी ए. बी. | सदस्य |
| ३) | डॉ. लोणीकर एस. व्ही. | सदस्य |
| ४) | प्राचार्य डॉ. गणगे के. एन. | सदस्य |
| ५) | डॉ. सूर्यवंशी एस. एस. | सदस्य |
| ६) | डॉ. शिळीमकर टी. एन. | सदस्य |
| ७) | डॉ. श्रीमती याजमान्य एस. आर. | सदस्या |
| ८) | ॲड. श्री. सलगर बी. एस. | सदस्य |
| ९) | डॉ. कदम एस. डी. | सदस्य |
| १०) | प्राचार्य डॉ. भांजे बी. एम. | सदस्य |
| ११) | डॉ. शेख ए. ए. | सदस्य |
| १२) | श्री. गायकवाड बी. आर. | सदस्य |
| १३) | डॉ. साळुंखे डी. जे., परीक्षा नियंत्रक | कायम निमंत्रित |
| १४) | डॉ. पुजारी डी. डी., वित्त व लेखा अधिकारी | कायम निमंत्रित |
| १५) | कॅप्टन डॉ. सोनजे एन. पी., कुलसचिव | सचिव |

**अनुपस्थिती :**

प्रा. डॉ. टी. आर. पाटील यांनी व्यवस्थापन परिषदेच्या या सभेस अनुपस्थित रहाणार असल्याचे दूरध्वनीद्वारे कळविले. त्यांच्या अनुपस्थितीची नोंद घेण्यात आली.

**स्वागतः**

कुलसचिवांनी सर्व सन्माननीय सदस्यांचे स्वागत केले.

**सदर सभेत खालील प्रमाणे कामकाज झाले.**

**[ १ ] दि.२९ नोव्हेंबर, २०११ रोजीच्या आडोतीसाव्या व्यवस्थापन परिषदेच्या सभेचा कार्यवृत्तांत वाचून कायम करणे.**

**ठराव : दि.२९ नोव्हेंबर, २०११ रोजीच्या आडोतीसाव्या व्यवस्थापन परिषदेच्या सभेचा कार्यवृत्तांत वाचून कायम करण्यात आला व कार्यवाही अहवालाची नोंद घेण्यात आली.**

**[ ०२ ] महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ कलम २८ (भ) नुसार व्यवस्थापन परिषदेस मा.कुलगुरु यांनी सादर करावयाचा अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे सादर.**

(टिपणी: महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ कलम २८ (भ) नुसार मा.कुलगुरु यांचा अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे सादर करणे आवश्यक आहे. त्यानुसार मा.कुलगुरु यांचा अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे सादर).

**ठराव : मा.कुलगुरु यांच्या अहवालाची नोंद घेण्यात आली.**

**[ ०३ ] अभियांत्रिकी व तंत्रज्ञान विद्याशाखांतर्गत M. Pharmacy या कोर्सच्या अभ्यासक्रमासाठीचे नविन अध्यादेश क्र. २६ (Ordinance - 26) व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

**(टिपणी-** Pharmacy अस्थाई अभ्यासमंडळाच्या दि.१७/११/२०११ रोजीच्या बैठकीत ठराव क्र. ४ नुसार M. Pharmacy या कोर्सचे नविन अध्यादेश क्र. २६ (Ordinance - 26) अस्थाई अभ्यासमंडळाने स्वीकारुन, विद्याशाखेकडे शिफारस केलेले आहेत.

अभियांत्रिकी व तंत्रज्ञान विद्याशाखा दि.१३/१२/२०११ रोजीच्या बैठकीत ठराव क्र. १४ नुसार सदरचे अध्यादेश विद्याशाखेने स्वीकारुन, विद्यापरिषदेकडे शिफारस केलेली आहे.

विद्यापरिषदेच्या दि. ०३/०१/२०१२ रोजीच्या बैठकीतील ठराव क्र. १११ नुसार वरीलप्रमाणे M. Pharmacy या कोर्सचे नविन अध्यादेश क्र. २६ (Ordinance - 26) विद्यापरिषदेने स्वीकारुन, व्यवस्थापन परिषदेकडे शिफारस केलेली आहे.

**सबब, अभियांत्रिकी व तंत्रज्ञान विद्याशाखांतर्गत M.Pharmacy या कोर्सचे नविन अध्यादेश क्र. २६ (Ordinance - 26) हे जून २०१२-१३ पासून अंमलबजावणी करावयाचे असल्याने, महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ५३ नुसार व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ).**

**ठरावः अभियांत्रिकी व तंत्रज्ञान विद्याशाखांतर्गत M. Pharmacy या कोर्सच्या अभ्यासक्रमासाठीचे नविन अध्यादेश क्र. २६ (Ordinance - 26) यास मान्यता देण्यात आली.**

**[ ०४ ] अभियांत्रिकी व तंत्रज्ञान विद्याशाखेकडील सर्व पदवी स्तरावरील अभ्यासक्रमासाठी नव्याने तयार करण्यात आलेले अध्यादेश क्र. २७ (Ordinance - 27) व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

(टिपणी- अभियांत्रिकी व तंत्रज्ञान विद्याशाखेसाठीचे सर्व अभ्यासमंडळ व अस्थाई अभ्यासमंडळाच्या दि. १२/१२/२०११ रोजीच्या बैठकीत पदवी स्तरावरील नव्याने तयार करण्यात आलेले अध्यादेश क्र. २७ (Ordinance - 27) स्वीकारुन, विद्याशाखेकडे शिफारस केलेले आहेत.

अभियांत्रिकी व तंत्रज्ञान विद्याशाखा दि.१३/१२/२०११ रोजीच्या बैठकीत ठराव क्र. १४ नुसार सदरचे अध्यादेश विद्याशाखेने स्वीकारुन, विद्यापरिषदेकडे शिफारस केलेले आहेत.

विद्यापरिषदेच्या दि. ०३/०१/२०१२ रोजीच्या बैठकीतील ठराव क्र. ११२ नुसार वरीलप्रमाणे पदवी स्तरावरील नव्याने तयार करण्यात आलेले अध्यादेश क्र. २७ (Ordinance - 27) विद्यापरिषदेने स्वीकारुन, व्यवस्थापन परिषदेकडे शिफारस केलेली आहे.

**सबब, अभियांत्रिकी व तंत्रज्ञान विद्याशाखांतर्गत पदवी स्तरावरील नव्याने तयार करण्यात आलेले अध्यादेश क्र. २७ (Ordinance - 27) हे जून २०१२-१३ पासून अंमलबजावणी करावयाचे असल्याने, महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ५३ नुसार व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ).**

ठराव : **अभियांत्रिकी व तंत्रज्ञान विद्याशाखेकडील सर्व पदवी स्तरावरील अभ्यासक्रमासाठी नव्याने तयार करण्यात आलेले अध्यादेश क्र. २७ (Ordinance - 27) यास मान्यता देण्यात आली.**

**[ ०५ ]** **उपेक्षित वर्गातील गुणवंत विद्यार्थ्यांना "राजर्षी शाहू महाराज पुरस्कार" देणेकरीता तयार करण्यात आलेल्या नियमावलीचा मसुदा व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

(टिपणी - शाहू शिक्षण संस्था, कल्याण, जि. ठाणे या संस्थेकडील रु. १,००,०००/- निधी धनाकर्ष म. वि. का. १९९४ कलम २८ (h) नुसार व्यवस्थापन परिषदेने दि. १९/५/२०११ रोजीच्या बैठकीतील ठराव क्र. ४ अन्वये स्वीकारला आहे. सदर निधीतून उपेक्षित वर्गातील गुणवंत विद्यार्थ्यांना "राजर्षी शाहू महाराज पुरस्कार " देणेसंबधीची नियमावली तयार करणेकामी मा. कुलगुरुमहोदयांनी खालील त्रिसदस्यीय समिती नियुक्त केलेली आहे.

१) प्रा. मदने डी. व्ही.

२) प्रा. भोसले यु. व्ही.

३) प्रा. शिंदे जी. बी.

उक्त समितीने तयार केलेली नियमावली व्यवस्थापन परिषदेकडे शिफारस केलेली आहे.

**सबब, सन २०१०-११ या शै. वर्षामध्ये प्राप्त झालेल्या निधीच्या व्याजातून दरवर्षी उपेक्षित वर्गातील गुणवंत विद्यार्थ्यांना " राजर्षी शाहू महाराज " यांच्या नावाने पुरस्कार देणेसाठीची नियमावली व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ)**

**ठराव :** **उपेक्षित वर्गातील गुणवंत विद्यार्थ्यांना "राजर्षी शाहू महाराज पुरस्कार" देण्याकरीता तयार करण्यात आलेल्या नियमावलीच्या मसुद्यास मान्यता देण्यात आली.**

**[ ०६ ] एम. एस्सी. रसायनशास्त्र या विषयात परीक्षेमध्ये गुणानुक्रमे प्रथम येणा-या पदव्युत्तर स्नातकास "केशव राजाराम जोशी सुवर्णपदक" देणेकरीता तयार करण्यात आलेल्या नियमावलीचा मसुदा व्यवस्थापन परिषदेच्या माहितीस्तव.**

(टिपणी - श्री. केशव राजाराम जोशी, सोलापूर यांचेकडून रु. १,००,०००/- निधी स्वीकारण्यास व्यवस्थापन परिषदेने दि. ११/११/११ रोजीच्या बैठकीत ठराव क्र. ३ नुसार मान्यता दिलेली आहे.

सदर निधीच्या व्याजातून एम. एस्सी. परीक्षेमध्ये गुणानुक्रमे प्रथम येणा-या पदव्युत्तर स्नातकास दरवर्षी "केशव राजाराम जोशी सुवर्णपदक" देण्यासाठीच्या नियमावलीचा मसुदा (१) डॉ. लोणीकर एस. व्ही. (२) अॅड. सलगर बी. एस. या समितीने तयार केलेला आहे. त्यास मा. कुलगुरुमहोदयांनी मान्यता दिलेली आहे.

**सबब, एम. एस्सी. रसायनशास्त्र या विषयात परीक्षेमध्ये गुणानुक्रमे प्रथम येणा-या पदव्युत्तर स्नातकास "केशव राजाराम जोशी सुवर्णपदक" देणेकरीता तयार केलेल्या नियमावलीचा मसुदा व्यवस्थापन परिषदेच्या माहितीस्तव )**

**ठराव : मा.कुलगुरुमहोदयांनी केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.**

**[ ०७ ] मा. कुलगुरु, डॉ. बाबासाहेब बंडगर, यांनी स्वतःच्या व पत्नीच्या नावाने, तसेच आजी-आजोबा, आई-वडील व कन्येच्या स्मृतीप्रित्यर्थ पाच सुवर्णपदके विविध विद्याशाखांतर्गत गुणानुक्रमे सर्वप्रथम येणा-या पाच विद्यार्थी/विद्यार्थीनीस सुवर्णपदके देणेची इच्छा व्यक्त केली असून, याकरीता रु. ५,००,०००/- ची देणगी स्वीकारण्याची बाब महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम२८ (ज) नुसार विचारार्थ.**

(टिपणी - (१) आजी-आजोबा यांच्या स्मृतीप्रित्यर्थ "कै. सरस्वती निवृत्ती बंडगर सुवर्ण पदक" या नावाने कला व ललित कला विद्याशाखांतर्गत मराठी विषय घेऊन बी. ए. परीक्षेमध्ये सोलापूर विद्यापीठात गुणानुक्रमे सर्वप्रथम येणा-या विद्यार्थ्यांस किंवा विद्यार्थीनीस रु.१००,०००/- रकमेच्या व्याजाच्या रकमेतून सुवर्ण पदक.

(२) कन्येच्या स्मृतीप्रित्यर्थ "कै. सुनिता बाबासाहेब बंडगर सुवर्ण पदक" या नावाने विज्ञान विद्याशाखांतर्गत एम. एस्सी. (ऑरगॅनिक केमिस्ट्री) हा विषय घेऊन, परीक्षेत सोलापूर विद्यापीठात गुणानुक्रमे सर्वप्रथम येणा-या विद्यार्थीनीस रु.१००,०००/- रकमेच्या व्याजाच्या रकमेतून सुवर्ण पदक.

(३) आई-वडीलांच्या स्मृतीप्रित्यर्थ "श्रीमती चंद्रभागा पांडुरंग बंडगर सुवर्ण पदक" या नावाने वाणिज्य विद्याशाखांतर्गत बी. कॉम. परीक्षेमध्ये सोलापूर विद्यापीठात गुणानुक्रमे सर्वप्रथम येणा-या विद्यार्थ्यांस किंवा विद्यार्थीनीस रु.१००,०००/- रकमेच्या व्याजाच्या रकमेतून सुवर्ण पदक.

(४) "सौ. सोनाली बाबासाहेब बंडगर सुवर्ण पदक" या नावाने विज्ञान विद्याशाखांतर्गत बी. एस्सी. परीक्षेमध्ये सोलापूर विद्यापीठात गुणानुक्रमे सर्वप्रथम येणा-या विद्यार्थ्यास किंवा विद्यार्थीनीस रु.१००,०००/- रकमेच्या व्याजाच्या रकमेतून सुवर्ण पदक.

(५) "मा. कुलगुरु, डॉ. बाबासाहेब बंडगर सुवर्ण पदक" या नावाने अभियांत्रिकी विद्याशाखांतर्गत बी.ई. परीक्षेमध्ये सोलापूर विद्यापीठात गुणानुक्रमे सर्वप्रथम येणा-या विद्यार्थ्यास किंवा विद्यार्थीनीस रु.१००,०००/- रकमेच्या व्याजाच्या रकमेतून सुवर्ण पदक.

तसेच यंदाच्या वर्षी दिलेल्या रक्कमेमधून व्याज येणार नसल्याने, पाच सुवर्ण पदके तयार करण्याची तयारी दर्शविली आहे.

**उक्तप्रमाणे मा. डॉ. बाबासाहेब बंडगर, कुलगुरु, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांची स्वतःच्या व पत्नीच्या नावाने आणि आजी-आजोबा, आई-वडील व कन्येच्या स्मृतीप्रित्यर्थ सुवर्णपदक देण्याची इच्छा असल्याने, याकरीता रु. ५,००,०००/- ची देणगी व यंदाच्या वर्षासाठीची सुवर्ण पदके महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम२८ (ज) नुसार देणगी स्वीकारणेची बाब विचारार्थ.**

**ठराव :**

**अ) मा. कुलगुरु, डॉ. बाबासाहेब बंडगर, यांनी स्वतःच्या व पत्नीच्या नावाने, तसेच आजी-आजोबा, आई-वडील व कन्येच्या स्मृतीप्रित्यर्थ पाच सुवर्णपदके विविध विद्याशाखांतर्गत गुणानुक्रमे सर्वप्रथम येणा-या पाच विद्यार्थी/विद्यार्थीनीस सुवर्णपदके देण्याची इच्छा व्यक्त केली असून, याकरीता रु. ५,००,०००/- ची देणगी स्वीकारण्यास मान्यता देण्यात आली.**

**ब) तसेच मा.कुलगुरुंनी त्यांच्या पत्रात नमूद केल्याप्रमाणे सातव्या दीक्षांत समारंभात पहिल्या सुवर्णपदकास प्रत्यक्ष येणारा खर्च विद्यापीठाने स्विकारण्यास मान्यता देण्यात आली.**

**क) याबाबतची नियमावली डॉ. एस. व्ही. लोणीकर व ॲड. बी. एस. सलगर या द्विसदस्यीय समितीने करावी असे ठरले.**

**[ ०८ ]** **विद्यापीठाकडील प्रशासकीय कर्मचा-यांना पदोन्नती देण्याबाबत गठीत केलेल्या समितीचा अहवालानुसार मा. कुलगुरुमहोदयांनी केलेली कार्यवाही माहितीस्तव.**

(टिपणीः विद्यापीठातील पदोन्नतीच्या वाटयातील रिक्त पदावर प्रशासकीय कर्मचाऱ्यांना पदोन्नतीची शिफारस करणेसाठी नेमलेली समिती खालीलप्रमाणे-

१) प्रा.डॉ.एस.व्ही.लोणीकर सदस्य,व्यवस्थापन परिषद.

२) प्राचार्य डॉ.बी.एम. भांजे सदस्य,व्यवस्थापन परिषद.

३) डॉ.आर. बी. भोसले, सदस्य मागासवर्गीय प्रतिनधी व सचिव, विशेष कक्ष स्थायी

उक्तप्रमाणे, नेमलेल्या समितीने दि. २२/११/२०११ रोजी सोबत जोडल्याप्रमाणे पदोन्नती समितीने शिफारस केलेली आहे.

पदोन्नती समितीच्या अहवालास मा.कुलगुरुमहोदयांनी महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ मधील कलम १४(७) अन्वये व्यवस्थापन परिषदेच्या वतीने मान्यता दिलेली आहे.

मा.कुलगुरुमहोदयांनी केलेली कार्यवाही माहितीस्तव).

**ठराव :** **मा.कुलगुरुमहोदयांनी केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.**

**[ ०९ ] विद्यापीठाकडील प्रशासकीय कर्मचा-यांना पदोन्नती देण्याबाबत गठीत केलेल्या समितीचा अहवालानुसार मा. कुलगुरुमहोदयांनी केलेली कार्यवाही माहितीस्तव.**

(टिपणी: विद्यापीठातील पदोन्नतीच्या वाटयातील रिक्त पदावर प्रशासकीय कर्मचाऱ्यांना पदोन्नतीची शिफारस करणेसाठी नेमलेली समिती खालीलप्रमाणे-

१) प्रा.डॉ.एस.व्ही.लोणीकर सदस्य, व्यवस्थापन परिषद.

२) प्राचार्य डॉ.बी.एम. भांजे सदस्य, व्यवस्थापन परिषद.

३) डॉ.आर. बी. भोसले, सदस्य मागासवर्गीय प्रतिनधी व सचिव, विशेष कक्ष स्थायी

उक्तप्रमाणे, नेमलेल्या समितीने दि. १२/१२/२०११ रोजी सोबत जोडल्याप्रमाणे पदोन्नती समितीने शिफारस केलेली आहे.

पदोन्नती समितीच्या अहवालास मा.कुलगुरुमहोदयांनी महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ मधील कलम १४(७) अन्वये व्यवस्थापन परिषदेच्या वतीने मान्यता दिलेली आहे.

मा.कुलगुरुमहोदयांनी केलेली कार्यवाही माहितीस्तव).

**ठराव : मा.कुलगुरुमहोदयांनी केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.**

**[ १० ] विद्यापीठाकडील श्री. कांबळे डी. एस., कक्ष अधिकारी यांची सहा. कुलसचिव या पदासाठी पदोन्नती देण्याची बाब विचारार्थ.**

(टिपणी: - व्यवस्थापन परिषदेच्या दि. २१ जुलै, २०११ रोजीच्या बैठकीत कर्मचा-यांना पदोन्नतीसाठी पूर्व अट म्हणून निम्न संवर्गात/सेवेत/श्रेणीत किमान सेवेच्या अनुभवाची अट विहित करणेबाबतचा विषय ठेवणेत आलेला होता सदरचा विषय ठराव क्र. ०८ अन्वये अमान्य करण्यात आलेला आहे.

पंरतु, विभागीय पदोन्नती बैठकीतील दि. २२/११/२०११ रोजीच्या कार्यवृत्तांत खालीलप्रमाणे आहे.

श्री. कांबळे डी.एस यांनी शासन परिपत्रक क्र.सीबीसी-१०/२०१०/प्र.क्र.४७/मावक-५, मंत्रालय विस्तारभवन दि. २५/०३/२०१० अन्वये आवश्यक असलेले जाती वैधता प्रमाणपत्र सादर केले आहे. व ते कक्ष अधिकारी या पदावर ४ वर्ष ४ महिने २४ दिवस कार्यरत आहेत. त्यामुळे सामान्य प्रशासन विभाग परिपत्रक क्र. एस.आर.व्ही. २००५/प्र.क्र. ०१/२००५/१२, दि. २५/०२/२००५ नुसार श्री. कांबळे डी.एस पदोन्नतीस पात्र आहेत. व्यवस्थापन परिषदेच्या दि. २१/०७/२०११ रोजीच्या बैठकीत झालेल्या ठराव क्र. ०८ नुसार श्री. कांबळे डी.एस यांचा कक्ष अधिकारी या पदावरील सेवाकाल ५ वर्षापेक्षा कमी असल्याने ते पदोन्नतीस पात्र होत नाहीत.

तथापि, सोलापूर विद्यापीठ जाहिरात क्र. सोविसो/आस्था/५१/२०११ दि. १७/०६/२०११ नुसार सरळसेवेने सहाय्यक कुलसचिव पदासाठी अनुभवाची अट खालीलप्रमाणे

Five years' experience in administrative cadre not below the rank of superintendent in education institution or its equivalent post or at Senior College Lecturer with three years teaching experience.

**सबब, श्री. कांबळे डी. एस. कक्ष अधिकारी यांची सहा. कुलसचिव या पदासाठी पदोन्नती देण्याबाबत विभागीय पदोन्नती समितीने केलेली शिफारस विचारार्थ.)**

**ठराव : विद्यापीठाकडील श्री. कांबळे डी. एस. कक्ष अधिकारी यांची सहा. कुलसचिव या पदावर पदोन्नती देण्याबाबत विभागीय पदोन्नती समितीने केलेली शिफारस स्वीकारण्यात येवून श्री. कांबळे डी. एस. यांना सहा. कुलसचिव या पदावर पदोन्नती देण्यास मान्यता देण्यात आली.**

**[ ११ ] बाबुराव पाटील कला व विज्ञान महाविद्यालय, अनगर, ता.मोहोळ या महाविद्यालयातील बी.एस्सी. (ई.सी.एस.) हा अभ्यासक्रम शै.वर्ष २०११-१२ पासून बंद करण्याबाबत विद्यापरिषदेने केलेली शिफारस विचारार्थ.**

**(टिपणीः-** बाबुराव पाटील कला व विज्ञान महाविद्यालय, अनगर, ता.मोहोळ यांचेकडून शै.वर्ष २०११-१२ पासून बी.एस्सी. (ई.सी.एस.) हा अभ्यासक्रम बंद करण्याबाबतचा प्रस्ताव प्राप्त झाला होता.

**शै. वर्ष २०११-१२ पासून बंद करण्याचे पाठ्यक्रमः-**

**बी. एस्सी. (एंटायर कॉम्प्युटर सायन्स)**

सदर महाविद्यालयातील बी.एस्सी. (ई.सी.एस.) हा अभ्यासक्रम शै.वर्ष २०११-१२ पासून बंद करण्यासाठी आवश्यक ती चौकशी करुन त्यावर सविस्तर अहवाल सादर करण्यासाठी महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ९२ (३) अन्वये विद्यापरिषदेने खालीलप्रमाणे स्थानिक चौकशी नियुक्त केली होती.

| | | |
|---|---|---|
| **१.** | **प्राचार्य डॉ. ए. एल. देशमुख** | **अध्यक्ष** |
| **२.** | **प्रा. डॉ. बी. पी. लाडगावकर** | **सदस्य** |
| **३.** | **प्रा. डॉ. व्ही. एल. कदम** | **सदस्य** |

सदर समितीने महाविद्यालयास भेट देऊन सविस्तर अहवाल विद्यापीठाकडे सादर केलेला आहे. समितीने बी.एस्सी. (ई.सी.एस.) हा अभ्यासक्रम शै.वर्ष २०११-१२ पासून बंद करण्यास अटी पूर्तता करण्याच्या अधीन राहून शिफारस केलेली आहे. त्याप्रमाणे चौकशी समितीने सुचविलेल्या अटी पूर्तता करण्याबाबत महाविद्यालयास कळविले होते. त्याअनुषंगाने महाविद्यालयाकडून अटी पूर्तता अहवाल प्राप्त झालेला असून सदर अटींची पूर्तता करण्यासाठी उपरोक्त समिती अध्यक्षांची एक सदस्यीय समिती नियुक्त करण्यात आली होती.

प्राचार्य डॉ. ए. एल. देशमुख यांच्या एक सदस्यीय समितीने महाविद्यालयास भेट देऊन अहवाल दि.२७/१२/२०११ रोजी विद्यापीठाकडे सादर केलेला असून बी.एस्सी. (ई.सी.एस.) हा अभ्यासक्रम शै. वर्ष २०११-१२ पासून बंद करण्याची शिफारस केलेली आहे. महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ९२ (३) (४) मध्ये खालीलप्रमाणे तरतुद आहे.

**९२ (३) - असा अर्ज मिळाल्यावर, ते महाविद्यालय किंवा मान्यताप्राप्त परिसंस्था बंद करण्यास परवानगी देण्यात यावी किंवा कसे याबद्दल मूल्यमापन करण्यासाठी विद्यापरिषद, तिला योग्य वाटेल अशी चौकशी करण्याची व्यवस्था करील. आवश्यक ते सहाय्य देऊन किंवा विद्यापीठाने ते महाविद्यालय किंवा परिसंस्था ताब्यात घेऊन किंवा अन्य व्यवस्थपनाकडे ती हस्तांतरित करुन, महाविद्यालय किंवा परिसंस्था बंद करण्याची बाब टाळता येईल किंवा कसे याचीही तपासणी विद्यापरिषदेस करता येईल.**

**व**

**९२ (४) - विद्यापरिषदेने, महाविद्यालय किंवा मान्यताप्राप्त परिसंस्था बंद करण्याची शिफारस करण्याचे ठरविल्यास, विद्यापरिषद, व्यवस्थापनांकडून वसूल करावयाच्या नुकसानभरपाईच्या किंवा भरपाईच्या रकमेचे प्रमाण आणि विद्यापीठ अनुदान आयोग, राज्य शासन किंवा इतर सार्वजनिक वित्तपुरवठा संस्था यांच्याकडून पुरविण्यात आलेल्या पैशांचा वापर करुन निर्माण करण्यात आलेल्या मत्ता, विद्यापीठाकडे किंवा इतर व्यवस्थापनांकडे हस्तांतरित करण्यात याव्यात किंवा कसे व कमी करण्यात आलेले अध्यापक व कर्मचारीवर्ग यांना द्यावयाची नुकसान भरपाई याबाबतीत अहवाल तयार करील व तो व्यवस्थापन परिषदेला सादर करील.**

बाबुराव पाटील कला व विज्ञान महाविद्यालय, अनगर, ता.मोहोळ या महाविद्यालयातील बी.एस्सी. (ई.सी.एस.) हा अभ्यासक्रम शै.वर्ष २०११-१२ पासून बंद करण्याबाबतचा विषय दि.३/०१/२०१२ रोजीच्या विद्यापरिषदेसमोर विचारार्थ सादर केला असता सदर सभेने ठराव क्र.१२२(३) अन्वये सदर महाविद्यालयातील बी.एस्सी. (ई.सी.एस.) हा अभ्यासक्रम शै.वर्ष २०११-१२ पासून बंद करण्याची शिफारस व्यवस्थापन परिषदेस केलेली आहे.

**सबब बाबुराव पाटील कला व विज्ञान महाविद्यालय, अनगर, ता.मोहोळ या महाविद्यालयातील बी.एस्सी. (ई.सी.एस.) हा अभ्यासक्रम शै.वर्ष २०११-१२ पासून बंद करण्याची विद्यापरिषदेची शिफारस विचारार्थ).**

ठराव : **बाबुराव पाटील कला व विज्ञान महाविद्यालय, अनगर, ता.मोहोळ या महाविद्यालयातील बी.एस्सी. (ई.सी.एस.) हा अभ्यासक्रम शै.वर्ष २०११-१२ पासून बंद करण्याबाबत विद्यापरिषदेने केलेली शिफारस स्वीकारण्यात येवून शासनास शिफारस करण्यास मान्यता देण्यात आली.**

**[ १२ ] वालचंद कॉलेज ऑफ आर्टस ॲन्ड सायन्स, सोलापूर या महाविद्यालयाचा शै.वर्ष २०१२-१३ पासून पीजीडीसीए अभ्यासक्रम बंद करण्याची विद्या परिषदेची शिफारस विचारार्थ.**

**(टिपणी:- वालचंद कॉलेज ऑफ आर्टस ॲन्ड सायन्स, सोलापूर** यांच्याकडून शै.वर्ष २०१२-१३ पासून पीजीडीसीसए अभ्यासक्रम बंद करण्याबाबत प्रस्ताव प्राप्त झालेला होता.

त्याअनुषंगोन शै.वर्ष २०१२-१३ पासून पीजीडीसीए अभ्यासक्रम बंद करण्याबाबत महाविद्यालयाला भेट देवून अहवाल सादर करण्यासाठी महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ९२ (३) अन्वये विद्या परिषदेच्यावतीने मा.कुलगुरु महोदयांनी खालील प्रमाणे स्थानिक चौकशी समिती नियुक्त केलेली होती.

**१.मा.प्रा.डॉ.याजमान्य एस.आर (अध्यक्ष) २.मा.प्रा.डॉ.शेख ए.ए (सदस्य)**
**३.मा.ॲड.सलगर बी.एस (सदस्य)**

समितीने उपरोक्तकामी महाविद्यालयास भेट देवून अहवाल सादर केलेला आहे व सदर महाविद्यालयाची पीजीडीसीए अभ्यासक्रम बंद करण्याबाबत शिफारस केलेली आहे. म.वि.कायदा १९९४ कलम ९२ (३) (४) मध्ये खालीलप्रमाणे तरतूद आहे.

**९२ (३) - असा अर्ज मिळाल्यावर ते महाविद्यालय किंवा मान्यताप्राप्त परिसंस्था बंद करण्यास परवानगी देता यावी किंवा कसे याबददल मूल्यमापन करण्यासाठी विद्यापरिषद, तिला योग्य वाटेल अशी चौकशी करण्याची व्यवस्था करील. आवश्यक ते सहाय्य देऊन किंवा विद्यापीठाने ते महाविद्यालय किंवा परिसंस्था ताब्यात घेवून किंवा अन्य व्यवस्थापनाकडे ती हस्तांतरित करुन, महाविद्यालय किंवा परिसंस्था बंद करण्याची बाब टाळता येईल किंवा कसे याचीही तपासणी विद्यापरिषदेस करता येईल.**

**व**

**९२ (४) -विद्यापरिषदेने महाविद्यालय किंवा मान्यताप्राप्त परिसंस्था बंद करण्याची शिफारस करण्याचे ठरविल्यास, विद्यापरिषद व्यवस्थापनाकडून वसूल करावयाच्या नुकसान भरपाईच्या किंवा भरपाईच्या रकमेचे प्रमाण आणि विद्यापीठ अनुदान आयोग, राज्य शासन किंवा इतर सार्वजनिक वित्त पुरवठा यांच्याकडून पुरविण्यात आलेल्या पैशांचा वापर करुन निर्माण करण्यात आलेल्या मत्ता, विद्यापीठाकडे किंवा इतर व्यवस्थापनांकडे हस्तांतरीत करण्यात याव्यात किंवा कसे व कमी करण्यात आलेले अध्यापक व कर्मचारी वर्ग यांना द्यावयाची नुकसान भरपाई याबाबतीत अहवाल तयार करील व तो व्यवस्थापन परिषदेला सादर करतील.**

वालचंद कॉलेज आर्टस ॲन्ड सायन्स, सोलापूर या महाविद्यालयाचा पी.जी.डी.सी.ए हा अभ्यासक्रम शै.वर्ष २०१२-१३ पासून बंद करण्याबाबतचा विषय दि.०३.०१.२०१२ रोजीच्या विद्या परिषदेसमोर विचारार्थ सादर केला असता सदर सभेने ठराव क्रं ११७ अन्वये सदर महाविद्यालयाचा पी.जी.डी.सी.ए अभ्यासक्रम शै.वर्ष २०१२-१३ पासून बंद करण्याची शिफारस व्यवस्थापन परिषदेस केलेली आहे.

सबब वालचंद कॉलेज आर्टस ॲन्ड सायन्स, सोलापूर या महाविद्यालयाचा शै.वर्ष २०१२-१३ पासून पीजीडीसीए अभ्यासक्रम बंद करण्याची विद्या परिषदेची शिफारस विचारार्थ).

उपरोक्त विषय आगामी व्यवस्थापन परिषदे समोर सादर करण्यास मान्यता असावी.

**ठराव : वालचंद कॉलेज ऑफ आर्टस ॲन्ड सायन्स, सोलापूर या महाविद्यालयाचा शै.वर्ष २०१२-१३ पासून पीजीडीसीए अभ्यासक्रम बंद करण्याची विद्या परिषदेची शिफारस स्वीकारण्यात येवून शासनास शिफारस करण्यास मान्यता देण्यात आली.**

**[ १३ ]** **सातव्या दीक्षांत समारंभात मार्च /एप्रिल २०११ अखेर सर्व विद्याशाखेच्या परीक्षेमध्ये उत्तीर्ण झालेल्या व डिसेंबर २०११ अखेर विद्यावाचस्पती पदवी संपादित केलेल्या स्नातकांना पदव्या, पदविका, प्रमाणपत्रे प्रदान करण्याची बाबत विद्यापरिषदेने केलेली शिफारस विचारार्थ.**

(टिपणी : प्रस्तुत विद्यापीठाच्या वतीने घेण्यात आलेल्या परीक्षेमध्ये जे विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत अशा विद्यार्थ्यांना पदव्या, पदविका, प्रमाणपत्रे, विद्यावाचस्पती पदवी प्रदान करणे याबाबत महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ कलम ९६ (१) मधील तरतूद खालीलप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| **कलम ९६ (१)** | **"व्यवस्थापन परिषदेस, विद्यापरिषदेकडून शिफारस करण्यात येतील अशा पदव्या, पदविका, प्रमाणपत्रे व विद्याविषयक इतर विशेषोपाधी सुरु आणि प्रदान करता येतील"** |

वरील तरतूद विचारात घेता मार्च / एप्रिल २०११ अखेर सर्व विद्याशाखेच्या परीक्षेमध्ये उत्तीर्ण

झालेल्या व डिसेंबर २०११ अखेर विद्यावाचस्पती पदवी संपादित केलेल्या स्नातकांना पदव्या, पदविका, प्रमाणपत्रे प्रदान करण्याची बाब महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ मधील कलम ९६(१) नुसार दि. ०३/०१/२०१२ रोजीच्या विद्यापरिषदेसमोर विषय क्र. ५८ नुसार ठेवली असता त्यावर खालील प्रमाणे ठराव झाला आहे.

| | |
|---|---|
| **ठराव :** | **मार्च/एप्रिल २०११ अखेर सर्व विद्याशाखेच्या परीक्षेमध्ये उत्तीर्ण झालेल्या व डिसेंबर, २०११ अखेर विद्यावाचस्पती पदवी संपादित केलेल्या स्नातकांना पदव्या, पदविका, प्रमाणपत्रे प्रदान करण्याची बाब महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ मधील कलम ९६(१) अन्वये व्यवस्थापन परिषदेस शिफारस करीत आहे.** |

सबब, विद्यापरिषदेने केलेली शिफारस विचारार्थ).

**ठराव :** **मार्च/एप्रिल २०११ अखेर सर्व विद्याशाखेच्या परीक्षेमध्ये उत्तीर्ण झालेल्या व डिसेंबर, २०११ अखेर विद्यावाचस्पती पदवी संपादित केलेल्या स्नातकांना पदव्या, पदविका, प्रमाणपत्रे प्रदान करण्याबाबत विद्यापरिषदेने केलेली शिफारस स्वीकारण्यात येवून मान्यता देण्यात आली.**

**[ १४ ] विद्यापीठाच्या ७ व्या दिक्षांत समारंभाकरिता मंडप व इलेक्ट्रिक साऊंड सिस्टिमचे काम करणे या कामाची निविदा मागवून केलेल्या प्रक्रियेची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

(टिपणीः वरील विषयांकित विद्यापीठाच्या ७ व्या दिक्षांत समारंभाकरिता मंडप व इलेक्ट्रिक साऊंड सिस्टिमचे काम करणे या कामासाठीची जाहीर निविदा सूचना दि. १४/१२/२०११ रोजीच्या दै. सकाळ या दैनिकांमधून देण्यात येवून अंतिम दि. २१/१२/२०११ पर्यत निविदा मागविण्यात आलेल्या आहेत.

अंतिम दिनांकापर्यत विद्यापीठ कार्यालयास चार फर्मकडून निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त निविदांचा तुलनात्मक तक्ता सोबत जोडला आहे. त्यापैकी सर्वात कमीत कमी दराची निविदा प्राप्त झालेल्या फर्मच्या प्रतिनिधी सोबत दि. २७/१२/२०११ रोजी दुपारी ३:०० वाजता वाटाघाटी करण्यात आल्या. त्यानुसार सर्वात कमी दर असलेले मे. श्रवंती मंडप व इले. डेकोरेटर्स, सोलापूर यांची तुलनात्मक तक्त्यामधील नमूद केलेल्या दराने सोलापूर विद्यापीठाच्या ७ व्या दिक्षांत समारंभाकरिता मंडप व इलेक्ट्रिक साऊंड सिस्टिमचे काम करणेसाठी शिफारस करण्यात आली आहे.

सबब, विद्यापीठाच्या ७ व्या दिक्षांत समारंभाकरिता मंडप व इलेक्ट्रिक साऊंड सिस्टिमचे काम करणे सोबत जोडलेल्या तुलनात्मक तक्त्यामधील नमूद केलेल्या [मंडप रू.२,४०,०००/- व जनरेटर रू.१५००/- प्रति तास] दराप्रमाणे मे. श्रवंती व इले. डेकोरेटर्स, सोलापूर यांना शिफारस करण्यात आलेली असून मंजुरी देण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.)

**ठराव : विद्यापीठाच्या ७ व्या दीक्षांत समारंभाकरिता मंडप व इलेक्ट्रिक साऊंड सिस्टिमचे काम करणे या कामाची निविदा मागवून केलेल्या प्रक्रियेस व मंडप रु.२,४०,०००/- व जनरेटर रु.१,५००/- प्रति तास दराप्रमाणे मे. श्रवंती व इले. डेकोरेटर्स, सोलापूर यांना काम देण्यास मान्यता देण्यात आली.**

**[ १५ ] सोलापूर विद्यापीठ परिसरातील सोलापूर सायन्स सेंटर यांना एक्सप्रेस फिडर लाईन वरून विद्युत कनेक्शन देणेबाबत विचारार्थ.**

(टिपणी: सोलापूर विद्यापीठ व दुध पंढरी या दोघांमध्ये असलेल्या विद्युत एक्सप्रेस फिडर लाईन कनेक्शन मधून विद्यापीठ परिसरातील सोलापूर सायन्स सेंटर यांना विद्युत एक्सप्रेस फिडर लाईन मधून विद्युत कनेक्शन मिळणेबाबत मा. अध्यक्ष, सोलापूर सायन्स सेंटर, जिल्हाधिकारी, सोलापूर वरील संदर्भिय पत्रान्वये नाहरकत ची विनंती केली आहे.

विद्युत एक्सप्रेस कनेक्शन लाईन देणेबाबतची पार्श्वभूमी खालीलप्रमाणे आहे.

एक्सप्रेस विद्युत फिडर कनेक्शन सोलापूर विद्यापीठ व दुध पंढरी या दोघामध्ये एकूण खर्च रक्कम रू.२६,०६,२००/- रक्कम पैकी विद्यापीठ रु.१३,०३,१००/- व दुध पंढरीने रू.१३,०३,१००/- हिस्सा भरून घेण्यात आलेली आहे.

तसेच यानंतर खालील प्रमाणे एक्सप्रेस फिडर पोटी हिस्सा भरून एक्सप्रेस फिडर कनेक्शन देण्यात आलेला आहे.

| अ. क्र. | संस्थेचे नाव | रक्कम रू. | शेरा |
|---|---|---|---|
| ०१ | भारतरत्न इंदिरा गांधी कॉलेज, केगांव | रू.१२,९३,३७५/- | मा. व्यवस्थापन परिषद सभा दि.२८/०२/२०११ रोजीच्या ठराव क्र.१४ |
| ०२ | मे. डि. एस. के. मोटार्स, सोलापूर | रू.१२,९३,३७५/- | |

सबब, मा. अध्यक्ष, सोलापूर सायन्स सेंटर, तथा जिल्हाधिकारी, सोलापूर यांचे दि. ०७/१२/२०११ रोजीचे पत्र एक्सप्रेस फिडर लाईन वरून सोलापूर सायन्स सेंटर यांना विद्युत कनेक्शनची नाहरकत प्रमाणपत्र देण्याबाबतची केलेली विनंती विचारार्थ.)

**ठराव : सोलापूर विद्यापीठ परिसरातील सोलापूर सायन्स सेंटर यांना एक्सप्रेस फिडर लाईन वरून विद्युत कनेक्शन देण्याबाबत नाहरकत प्रमाणपत्र देण्यास मान्यता देण्यात आली.**

**[ १६ ] वित्त व लेखा समितीच्या दि. ०७/०१/२०१२ रोजीच्या बैठकीत ठराव क्र. २ नुसार खरेदी समितीने केलेली शिफारस वित्त व लेखा समितीने स्वीकारून, व्यवस्थापन परिषदेकडे केलेली शिफारस विचारार्थ.**

**(टिपणी :** खरेदी समितीची दि.०३/०१/२०१२ रोजी झालेल्या बैठकीत ठराव क्र.२, ३ अन्वये वित्त व लेखा समितीकडे खरेदी बाबतची केलेली शिफारस, वित्त व लेखा समितीने दि.०७/०१/२०१२ रोजीच्या बैंठकीत ठराव क्र. २ नुसार स्वीकारून मान्यतेस्तव व्यवस्थापन परिषदेकडे सर्वानुमते शिफारस केलेली आहे.

**सबब, वित्त व लेखा समितीची ठराव क्र.२ नुसार केलेली शिफारस विचारार्थ.)**

ठराव : **वित्त व लेखा समितीच्या दि.०७/०१/२०१२ रोजीच्या बैठकीत ठराव क्र.२ नुसार खरेदी समितीने केलेली शिफारस व वित्त व लेखा समितीने केलेली शिफारस स्वीकारून त्यास खालीलप्रमाणे मान्यता देण्यात आली.**

| | |
|---|---|
| **ख.स. ठराव क्र.१** | **नोंद घेण्यात आली.** |
| **ख.स. ठराव क्र.२** | **शिफारस स्वीकारुन मान्यता देण्यात आली.** |
| **ख.स. ठराव क्र.३** | **शिफारस स्वीकारुन मान्यता देण्यात आली.** |

**[ १७ ] दि.०६/०१/२०१२ रोजी झालेल्या बांधकाम समितीचा कार्यवृत्तांत विचारार्थ.**

(टिपणी - बांधकाम समितीची सभा दि. ०६/०१/२०१२ रोजी आयोजित करण्यात आलेली होती. सदर समितीच्या कार्यवृत्तांतास परिनियम 339 (f) अन्वये व्यवस्थापन परिषदेची मान्यता घेणे आवश्यक आहे.

सबब, दि. ०६/०१/२०१२ रोजीचा बांधकाम समितीचा कार्यवृत्तांत विचारार्थ).

**ठराव : दि.०६/०१/२०१२ रोजी झालेल्या बांधकाम समितीच्या कार्यवृत्तांतास खालीलप्रमाणे मान्यता देण्यात आली.**

| | |
|---|---|
| **बां. स. ठराव क्र. १** | **नोंद घेण्यात आली.** |
| **बां. स. ठराव क्र. २** | **मान्यता देण्यात आली.** |
| **बां. स. ठराव क्र. ३** | **मान्यता देण्यात आली.** |
| **बां. स. ठराव क्र. ४** | **मान्यता देण्यात आली.** |
| **बां. स. ठराव क्र. ५(१)** | **मान्यता देण्यात आली.** |

**[ १८ ] पौरवी शिक्षण प्रसारक मंडळ, सोलापूर संचलित पौरवी इन्स्टिट्युट ऑफ मॅनेजमेंट ॲन्ड रिसर्च, सोलापूर या महाविद्यालयास तात्पुरत्या स्वरुपात देण्यात आलेले प्रथम संलग्निकरण ए.आय.सी.टी.ई. या शिखर संस्थेच्या पत्रान्वये रद्द केल्याची बाब माहितीस्तव व सदर महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना विद्यापीठातील वाणिज्य व व्यवस्थापन संकुलातील एम.बी.ए. अभ्यासक्रमास वर्ग करणेबाबत शासनास विनंती करणेची बाब विचारार्थ.**

**(टिपणी:- पौरवी शिक्षण प्रसारक मंडळ, सोलापूर या संस्थेच्या नवीन पौरवी इन्स्टिट्युट ऑफ मॅनेजमेंट ॲन्ड रिसर्च, सोलापूर या महाविद्यालयास (एम.बी.ए. अभ्यासक्रम) कायम विना अनुदानित तत्वावर ए.आय.सी.टी.ई., नवी दिल्ली यांनी त्यांच्या संकेत स्थळावर प्रसिध्द केलेल्या यादीनुसार व** महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मुंबई यांचेकडील शासन निर्णय क्र.टिईएस-२०११/प्र.क्र.१६२/तांशि-४, दि.३० जून २०११ अन्वये मान्यता मिळाली होती. त्या अनुषंगाने मा.कुलगुरु महोदय यांच्या मान्यतेने सदर महाविद्यालयास अटी पूर्ततेच्या अधीन राहून तात्पुरते प्रथम संलग्निकरण दिलेले असून अंतिम मान्यता देण्यासंदर्भात कार्यवाही सुरु होती.

पौरवी शिक्षण प्रसारक मंडळ, सोलापूर संचलित पौरवी इन्स्टिट्युट ऑफ मॅनेजमेंट रिसर्च, सोलापूर या महाविद्यालयाची मान्यता ए.आय.सी.टी.ई., नवी दिल्ली यांचे पत्र संदर्भ क्र. F.No.Western/2011/1-473866541, दि.२२/१२/२०११ अन्वये काढून घेतलेली आहे, असे कळविले आहे.

तसेच सदर महाविद्यालयात प्रवेशित असलेल्या विद्यार्थ्यांचे हित लक्षात घेऊन जवळच्या इतर महाविद्यालयात वर्ग करण्याबाबत ए.आय.सी.टी.ई, नवी दिल्ली यांनी शासनास सोबतच्या पत्रान्वये (F.No.Western/2011/1-473866541, dated.29/12/2011) कळविले आहे. तरी सदर महाविद्यालयात प्रवेशित असलेले विद्यार्थी विद्यापीठातील वाणिज्य व व्यवस्थापन संकुलातील सुरु असणाऱ्या एम.बी.ए. या अभ्यासक्रमास वर्ग करणेबाबत शासनास विनंती करणे आवश्यक आहे.

**पौरवी शिक्षण प्रसारक मंडळ, सोलापूर संचलित पौरवी इन्स्टिट्युट ऑफ मॅनेजमेंट ॲन्ड रिसर्च, सोलापूर या महाविद्यालयास तात्पुरत्या स्वरुपात देण्यात आलेले प्रथम संलग्निकरण ए.आय.सी.टी.ई. या शिखर संस्थेच्या पत्रान्वये रद्द केल्याची बाब माहितीस्तव व सदर महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना विद्यापीठातील वाणिज्य व व्यवस्थापन संकुलातील एम.बी.ए. अभ्यासक्रमास वर्ग करणेबाबत शासनास विनंती करणेची बाब विचारार्थ.)**

**ठराव :** **अ) ए.आय.सी.टी.ई. नवी दिल्ली यांचे पत्र क्र.** F.No.Western/2011/1-473866541, **दि.२२/१२/२०११ ची नोंद घेण्यात आली.**

**ब) पौरवी इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट ॲन्ड रिसर्च, सोलापूर या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना विद्यापीठातील वाणिज्य व व्यवस्थापन संकुलातील एम.बी.ए. अभ्यासक्रमास वर्ग करण्याबाबत शासनास विनंती करण्यास मान्यता देण्यात आली.**

**[१९ (१)] व्यवस्थापन परिषद ठराव क्रं ८ दि.२९/११/२०११ अन्वये वसुंधरा कला महाविद्यालय, सोलापूर या महाविद्यालयाने दंडाची रक्कम रु. ३ लाख भरल्याची बाब माहितीस्तव.**

(टिपणी: वसुंधरा कला महाविद्यालय, सोलापूर या महाविद्यालयाने सन २००६-०७ पासून विद्यापीठाचे संलग्निकरण नसताना बी.ए भाग १ या अभ्यासक्रमाची अतिरीक्त तुकडी सुरु केलेली आहे व विद्यार्थी प्रवेशित केलेले आहेत व तसेच शै.वर्ष २००८-०९ पासून बी.ए भाग १ व २ या अभ्यासक्रमाच्या अतिरीक्त तुकडया सुरु केले असल्याचे व मान्य प्रवेश क्षमतेपेक्षा जादा विद्यार्थ्यांनाही आज अखेर प्रवेशित केलेले असल्याचे निदर्शनास आले होते.

त्याअनुषंगाने सदरचा विषय दि.२६/०४/२०११ रोजीच्या विद्या परिषदे समोर विषय क्रं २२० अन्वये सादर केला असता ठराव क्रं २२० नुसार खालील प्रमाणे ठराव झालेला आहे.

"उपरोक्त संदर्भात दंडाबाबतची योग्य ती कार्यवाही करुन सदर तुकडयांना व अतिरीक्त विद्यार्थी प्रवेश क्षमतेस प्रथम संलग्निकरण द्यावे अशी व्यवस्थापन परिषदेस शिफारस करण्यात आली."

विद्या परिषदेच्या उपरोक्त ठरावान्वये सदरचा विषय दि. १९/०५/२०११ रोजीच्या व्यवस्थापन परिषदे समारे विषय क्रं १६ अन्वये विचारार्थ सादर केला असता खालील प्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

"सदरचा विषय पुन:श्च सादर करावा असे ठरले "

उपरोक्त ठरावानुसार सदर महाविद्यालय उपरोक्त प्रमाणे विद्यापीठाच्या परवानगीशिवाय विद्यार्थी प्रवेशित केल्याची बाब दि.२१/०७/२०११ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेसमोर विषय क्रं २३ अन्वये पुर्न:विचारार्थ सादर केला असता व्यवस्थापन परिषदेने खालील प्रमाणे ठराव पारित केलेला आहे.

" नियमानुसार दंड आकारणीचे पत्र देवून त्यासंदर्भात पुढील कार्यवाहीचे अधिकार मा.कुलगुरुंना देण्यात आले."

उपरोक्त ठरावाच्या अनुषंगाने शै.वर्ष २००६-०७ ते शै.वर्ष २०१०-११ पर्यंत सदर मान्यता न घेतलेल्या तुकडीमधून एकूण ९५१ विद्यार्थी प्रवेशित केलेल्यामुळे अध्यादेश ०.४४ (ii) व ०.४४ (iii) अन्वये महाविद्यालयास खालील प्रमाणे दंड आकारण्यात आला होता.

१. O.४४ (ii) नुसार मान्यता न घेतलेल्या उपरोक्त तीन तुकडयांचा दंड ३ X १, ००,००० = ३,००,००० /-

२. O.४४ (iii) नुसार मान्यता न घेता विद्यार्थी प्रवेशित केल्याबाबत दंड ९५१ X ८०० = ७,६०,८०० /-

उपरोक्तप्रमाणे एकूण रु.१०,६०,८००/- दंड भरण्याबाबत महाविद्यालयाला पत्राव्दारे कळविण्यात आले होते. (प्रपत्र अ)

उपरोक्त पत्राच्या अनुषंगाने मा.प्राचार्य, वसुंधरा कला महाविद्यालय यांनी सदर महाविद्यालय हे सोलापूर हद्दवाढ भागातील असून गरीब, होतकरु व बहुतांशी मगासवर्गीय विद्यार्थी महाविद्यालयात शिक्षण घेतात शिक्षणापासून विद्यार्थी वंचित राहू नये या हेतूने महाविद्यालयात कायम विना अनुदान तत्वावरील तुकडयात जास्त विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आला तसेच त्यांच्यांकडून कोणतीही देणगी

किंवा अधिकचे शुल्क घेण्यात आलेले नाही त्यामुळे दंडाची रक्कम माफ करावा असे पत्रान्वये कळविले होते. (प्रपत्र ब)

तथापि सदरची विनंती अमान्य केल्याचे व त्वरीत उपरोक्त दंडाची रक्कम भरण्याबाबत विद्यापीठाने महाविद्यालयास कळविले होते. (प्रपत्र क) तसेच वेळेत दंड न भरल्यामुळे महाविद्यालयास दंड भरण्याबाबत स्मरणपत्रही पाठविण्यात आले होते.(प्रपत्र ड)

त्याअनुषंगाने मा.प्राचार्य, वसुंधरा कला महाविद्यालय, सोलापूर यांनी उपरोक्त दंडाच्या रक्कमेपैकी रु.३ लाख इतकी रक्कम दंडापोटी स्विकारुन उर्वरीत रक्कम माफ करण्याबाबत दि.१५.११.२०११ रोजीच्या पत्रान्वये विनंती केलेली होती .

मा.प्राचार्य, वसुंधरा कला महाविद्यालय, सोलापूर यांचे दंडाची रक्कम कमी करण्याबाबतचे विनंती पत्र दि.२९.११.२०११ रोजीच्या व्यवस्थापन परिषदे समोर विचारार्थ विषय क्रं ८ व्दारे सादर केला असता खालील प्रमाणे ठराव पारित करण्यात आला होता.

मा.प्राचार्य, वसुंधरा कला महाविद्यालय, सोलापूर यांना करण्यात आलेल्या एकूण दंड रु. १०,६०,८०० /- पैकी रु. ३,००,००० /- इतकी रक्कम दंडापोटी स्विकारण्यास व उर्वरीत रक्कम रु. ७,६०,८०० /- माफ करण्यास मान्यता देण्यात आली.

उपरोक्त ठरावानुसार मा.प्राचार्य, वसुंधरा कला महाविद्यालय, सोलापूर यांना या कार्यालयाच्या पत्रान्वये रु. ३ लाख दंडाची रक्कम भरण्याबाबत व उर्वरीत रक्कम माफ केल्याबाबत कळविण्यात आले होते.

महाविद्यालयाने व्यवस्थापन परिषदेच्या दि.२९/११/२०११ रोजीच्या ठरावानुसार रु. ३ लाख दंडाच्या रकमेचा भरणा वित्त व लेखा विभागाकडे दि.०५/०१/२०१२ रोजी सादर केला असून दंड भरल्याची पावती महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ विभागाकडे सादर केलेली आहे. सदरची बाब माहितीस्तव )

**ठराव :** **व्यवस्थापन परिषदेच्या दि.२९/११/२०११ रोजीच्या सभेतील ठराव क्रं ८ अन्वये, वसुंधरा कला महाविद्यालय, सोलापूर या महाविद्यालयाने दंडाची रक्कम रु.३ लाख भरल्याची नोंद घेण्यात आली.**

**[१९ (२)] आंतरराष्ट्रीय कार्यशाळेसाठी Abstract/Confeence Pad छपाई करून घेण्याची बाब विचारार्थ.**

**(टिपणी:** सोलापूर विद्यापीठाकडील रसायनशास्त्र संकुलाकडे दिनांक २१ ते २४ जानेवारी, २०१२ या कालावधीत आंतरराष्ट्रीय कार्यशाळा आयोजित करण्यात येणार आहे. आंतरराष्ट्रीय कार्यशाळेस उपस्थित राहणाऱ्या संशोधक प्राध्यापक / विद्यार्थी यांचेकडून पेपर्स प्राप्त झालेले असून त्याचे Abstract व Confeence Pad छपाई करावयाची आहे. सदरचे Abstract व इतर छपाई करून घेण्याकरीता दै. सकाळ मध्ये दि.२१/१२/२०११ रोजी जाहीर निविदा सूचना प्रसिध्द करण्यात आली होती. सदर निविदा प्राप्त होण्याची अंतिम दिनांक-२९/१२/२०११ ही होती.

अंतिम दिनांकापर्यन्त छपाईसाठी एकूण तीन निविदा प्राप्त झाल्या. सदरच्या निविदा दोन लिफाफा पध्दतीने मागविण्यात आलेल्या होत्या. दि.२९/१२/२०११ रोजी निविदा उघडण्यात आल्या असून तुलनात्मक तक्त्यानुसार न्यूनतम दर असलेले मे. अनिल प्रिंटिग प्रेस, सोलापूर यांना वाटाघाटीसाठी दि.०७/०१/२०१२ रोजी मा. कुलगुरु यांच्या दालनात खरेदी समितीच्या सदस्यासमवेत निमंत्रीत केले असता सदर फर्मने वाटाघाटीत खालील प्रमाणे छपाईचे दर मान्य केले आहे. सोबत तक्ता जोडला आहे.

| अ. क्र. | तपशील | दर प्रती नग रु. | छपाईची संख्या अंदाजे | एकूण रुपये |
|---|---|---|---|---|
| १) | **Abstract** (कव्हर पेज, आतील मजकूर प्रती पान (२५० पाने) चार कलर मध्ये, जूळणी / बायडिंगसह | ६४५.३२ प्रती बुक | ४०० बुक्स् | २,५८,१२८/- |
| २) | **Conference Pad** (१०० Pages, 6 x 8 ½ inch) | ११/- प्रती पॅड | ४०० पॅड | ४,४००/- |

सबब, दराच्या तुलनात्मक तक्त्यानुसार न्यूनतम दर असलेले फर्म मे. अनिल प्रिंटीग प्रेस, सोलापूर यांचेकडून वरील प्रमाणे Abstract व Conference Pad छपाई करून घेण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ).

**ठराव : आंतरराष्ट्रीय कार्यशाळेसाठी Abstract/Confeence Pad न्यूनतम दर असलेले मे. अनिल प्रिंटींग प्रेस, सोलापूर यांच्याकडून छपाई करून घेण्यास मान्यता देण्यात आली.**

**[१९ (३)] रसायनशास्त्र संकुलातर्फे "Indian Society of Chemists and Biologist या संस्थेची १७ वी आंतरराष्ट्रीय परिषद Expanding Horizons in Chemical Biological Sciences: Innovations Cross-roads" परिषदेसाठी विद्यापीठ फंडातून रु.११ लाख तरतूद करणेबाबतची बाब विचारार्थ.**

**(टिपणी:** सोलापूर विद्यापीठाकडील रसायनशास्त्र संकुलाकडे दिनांक २१ ते २४ जानेवारी, २०१२ या कालावधीत Indian Society of Chemists and Biologist या संस्थेची १७ वी आंतरराष्ट्रीय परिषद "Expanding Horizons in Chemical Biological Sciences: Innovations Cross-roads" सदर परिषदेला विख्यात आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय शास्त्रज्ञ येणे अपेक्षीत आहे. त्यासाठी विद्यापीठामार्फत जमा-खर्चाचे नियोजन केलेले आहे व ते सोबत जोडले आहे. त्यासाठी जास्तीत-जास्त देणगी जमा करण्याची कार्यवाही सुरु आहे. पंरतू सदर परिषदेसाठी रुपये ११ लाख कमी पडण्याची शक्तय असल्याने त्याची तरतूद विद्यापीठ फंडातून होणे आवश्यक आहे.

सबब सदर परिषदेसाठी रुपये ११ लाख कमी पडण्याची शक्यता असल्याने त्याची तरतूद विद्यापीठ फंडातून होणेसाठी बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ).

**ठराव : रसायनशास्त्र संकुलातर्फे "Indian Society of Chemists and Biologist या संस्थेची १७ वी आंतरराष्ट्रीय परिषद Expanding Horizons in Chemical Biological Sciences: Innovations Cross-roads" परिषदेसाठी विद्यापीठ फंडातून रु.११ लाख तरतूद करण्यास मान्यता देण्यात आली.**

**[१९ (४)] रसायनशास्त्र संकुलातर्फे Indian Society of Chemists and Bilogist या संस्थेची १७ वी आंतरराष्ट्रीय परिषदेच्या केटरिंगसाठी स्वतंत्र समिती नियुक्ती करणे व जेवणाचा दर्जा ठरविणे, दराबाबत चर्चा करुन शिफारस करण्याचे अधिकार समितीस देणेबाबतची बाब विचारार्थ.**

**(टिपणी:** सोलापूर विद्यापीठाकडील रसायनशास्त्र संकुलाकडे दिनांक २१ ते २४ जानेवारी २०१२ या कालावधीत Indian Society of Chemists and Biologist या संस्थेची १७ वी आंतरराष्ट्रीय परिषद Expanding Horizons in Chemical Biological Sciences: Innovations Cross-roads" सदर परिषदेला विद्यार्थी, विख्यात आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय शास्त्रज्ञ असे एकूण ४०० व्यक्ती अंदाजे उपस्थित राहणार आहेत. सदरच्या कालावधीत उपस्थितांना चहा, नाष्टा, दोन वेळेचे भोजन अत्यंत चांगल्या प्रतीचे (आंतरराष्ट्रीय परिषदेस साजेशे) द्यावे लागणार आहे. त्यासाठी रुपये ५ लाख खर्च अपेक्षीत आहे. त्यासाठी निविदा मागविणे व त्यामधुन स्पर्धात्मक दर घेणे हा उचित पर्याय असला तरी, प्राप्त दरामध्ये जेवणाचा दर्जा (Quality नेमकी Specify करणे शक्य नसल्याने) ठरविणे अशक्य होणार आहे. पर्यायीने केटरिंगची चांगली सुविधा मिळणार नाही. यास्तव जाहिर निविदा न मागविता एक स्वतंत्र समिती नेमूण त्या समितीकडे जेवणाचा दर्जा ठरविणे, पुरवठादारा बरोबर दर्जा व दराबाबत चर्चा करणे, दर निश्चित करणे व पुरवठा आदेशासाठी शिफारस करणे इत्यादी अधिकार देणे उचित वाटते.

सदर समिती सदस्यांची नावे खालील प्रमाणे :

| अ.क्र. | नाव | पद |
|---|---|---|
| १) | डॉ. आर. आर. पाटील | अध्यक्ष |
| २) | डॉ. ई. एन. अशोककुमार | सदस्य |
| ३) | डॉ. एस. एस. सूर्यवंशी | सदस्य |
| ४) | डॉ. व्ही. पी. उबाळे | सदस्य |
| ५) | श्री. गिरीश कुलकर्णी | सदस्य |
| ६) | श्री. अशोक पाटील | सदस्य |

सबब, **आंतरराष्ट्रीय परिषदेच्या केटरिंगसाठी स्वतंत्र समिती नियुक्ती करणे व जेवणाचा दर्जा ठरविणे, दराबाबत चर्चा करुन शिफारस करण्याचे अधिकार समितीस देणेबाबतची बाब विचारार्थ).**

**ठराव : रसायनशास्त्र संकुलातर्फे Indian Society of Chemists and Bilogist या संस्थेची १७ वी आंतरराष्ट्रीय परिषदेच्या केटरिंगसाठी स्वतंत्र समिती नियुक्ती करण्यास व जेवणाचा दर्जा ठरविणे, दराबाबत चर्चा करुन शिफारस करण्याचे अधिकार समितीस देण्यास मान्यता देण्यात आली.**

**१९ (५) विद्यापीठामधील विविध अभ्यासक्रमांना देणगीदाराच्या ठेवीच्या व्याजातून बक्षिसे / सुवर्णपदके देण्याबाबतच्या ठेवीची किमान रक्कमेमध्ये सुधारणा करण्याची बाब विचारार्थ.**

(टिपणी : दि.१० मार्च, २०१० रोजीच्या बैठकीतील विषय क्र. १८ (२) वर खालीलप्रमाणे ठराव पारीत झालेला आहे.

| | |
|---|---|
| विषय क्र. १८(२) | विद्यापीठामधील विविध अभ्यासक्रमांना देणगीदाराच्या ठेवीतील रकमेच्या व्याजातून बक्षीस देण्याबाबतचा शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर कडील Proposed Amendment to Statute ५४४ (S ५४४) नुसार बदल बाबत विषय व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.<br>(टिपणीः प्राचार्य डॉ. एच. जी. कुलकर्णी यांना ३ वर्षाच्या व ५ वर्षाच्या विधी पदवी अभ्यासक्रमास प्रथम येणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्यांस रक्कम रु.५०१/- इतके बक्षीस देण्यासाठी १०% Endowment Fund, २५% Corpus Fund, ६५% मध्ये विद्यार्थ्यांना द्यावयाचे बक्षीस याप्रमाणे १००% होणारी रक्कम रु.१२,८४०/- त्यावर ६% व्याजदराने रु.७७०/- व्याज मिळेल (प्रत्येक बक्षीसासाठी) म्हणून दोन बक्षीसासाठी रु.२५,६८०/- इतकी रक्कम अनामत म्हणून घ्यावी लागेल. तरी सदरची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर). |
| ठराव क्र. १८(२) | विद्यापीठामधील विविध अभ्यासक्रमांना देणगीदाराच्या ठेवीची अनामत रक्कम कमीत कमी रु.५०,०००/- असावी. सदरच्या रकमेची विगतवारी १०% Endowment Fund, २५% Corpus Fund व उर्वरित ६५% बक्षीस रुपाने वितरीत करण्यास मान्यता देण्यात आली. |

उक्त ठराव अवलोकनी घेता, विद्यापीठामधील विविध अभ्यासक्रमांना देणगीदाराच्या ठेवीच्या व्याजाच्या रक्कमेतून विविध बक्षिसे / सुवर्णपदके देण्यासाठीच्या ठेवीची रक्कमेमध्ये रु.५०,०००/- किमान रक्कमे मध्ये सुधारणा करणेची बाब विचारार्थ).

**ऋाव : विद्यापीठामधील विविध अभ्यासक्रमांना देणगीदाराच्या ठेवीच्या व्याजातून बक्षिसे / सुवर्णपदके देण्याबाबतच्या ठेवीची किमान रक्कम रु.१,००,०००/- सुधारणा करण्यास मान्यता देण्यात आली.**

**<u>अभिनंदनाचे प्रस्ताव :</u>**

१) विद्यापीठाने केलेल्या प्रगतीबद्दल मा.कुलगुरुंच्या अभिनंदनाचा ठराव ॲड. बी. एस. सलगर यांनी मांडला त्यास डॉ. एस. डी. कदम यांनी अनुमोदन दिले.

२) राजर्षी शाहू महाराज पुरस्कार देण्याकरीता शाहू शिक्षण संस्था, कल्याण, जि. ठाणे या संस्थेने देणगी दिल्याबद्दल त्यांच्या अभिनंदनाचा ठराव ॲड. बी. एस. सलगर यांनी मांडला त्यास डॉ. टी. एन. शिळीमकर यांनी अनुमोदन दिले.

३) श्री. के. रा. जोशी यांनी विद्यापीठास दिलेल्या देणगीबद्दल त्यांच्या अभिनंदनाचा ठराव ॲड. बी. एस. सलगर यांनी मांडला त्यास प्राचार्य डॉ. बी. एम. भांजे यांनी अनुमोदन दिले.

४) मा.कुलगुरु यांनी देणगी दिल्याबाबत त्यांच्या अभिनंदनाचा ठराव ॲड. बी. एस. सलगर यांनी मांडला त्यास डॉ. ए. बी. सूर्यवंशी यांनी अनुमोदन दिले.

मा.कुलगुरु यांच्या परवानगीने सभा संपल्याचे कुलसचिव यांनी जाहीर केले.

**सही/-**
**सचिव**
**व्यवस्थापन परिषद**

**सही/-**
**अध्यक्ष**
**व्यवस्थापन परिषद**